# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** मंचर **Year (वर्ष):** 2021
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0682 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/12/2021 21:11 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 02/11/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/11/2020
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/12/2021 **Time (वेळ):** 19:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/12/2021 19:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 10 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पेठ तलाठी कार्यालय व हटेल ,बिकानेर पुणे नाशिक रोड प

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** वसंत राजाराम बागल
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पारगाव तर्फे खेड,आंबेगाव जिपुणे,मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पारगाव तर्फे खेड,आंबेगाव जिपुणे,मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. हेमंत भागवत | | | 1. तलाठी, पेठ तलाठी कार्यालय,मंचर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी वसंत राजाराम बागल, वय- 32 वर्षे, धंदा-नोकरी, रा.पारगाव तर्फे खेड, ता.आंबेगाव जि.पुणे, मो.नं. 8208443864.मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियांसह रहावयास असुन शेती व्यवसाय व खाजगी नोकरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी 01/11/2020 रोजी श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक अँटी करप्शन ब्युरो, पुणे यांना संपर्क करुन माझी तलाठी कार्यालय, पेठ चे तलाठी यांचेविरुद्ध लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. यावर मला तलाठी लोकसेवक केव्हा भेटतील असे विचारले असता मी दि.02/11/2020 रोजी भेटणार असल्याचे कळविले. त्याकरिता दि.02/11/2020 रोजी हटेल बिकानेर, पेठ नजिक, पुणे नाशिक रोड येथे भेटण्यावे ठरले.दि.02/11/2020 रोजी मी हटेल बिकानेर, पेठ नजिक, पुणे नाशिक रोड येथे थांबुन राहिलो असता श्रीमती सरग मडम आल्यांनतर सदर ठिकाणी त्यांनी पंच सापळा पथक व माझी अशी ऐकमेकांस ओळख करुन दिली. त्यांनतर पंचांना माझ्या तक्रारीचे अनुषंगाने त्यांचेसोबत गोपनिय कामकाज करण्यासाठी जावायाचे आहे त्यासाठी आपण पंच म्हणून काम करण्यास तयार आहात का असे दोन्ही पंचांना विचारले असता त्यांनी त्यास त्यानी होकार दिला. त्यानंतर आपण मला तलाठी यांचे विरूद्ध असलेली तक्रार पंचा समक्ष कथन करण्यास सांगितली असता मी माझी तलाठी भागवत यांचे विरूध्द असलेली लाचेची तक्रार कथन केली व ती पंचासमक्ष स्वरूहस्ताक्षरात लिहुन दिली ती खालील प्रमाणे- मी वरील प्रमाणे असुन वरील नमुद ठिकाणी माझ्या कुटुंबियांसह राहण्यास असुन मी अंदाजे दिड ते दोन आठवडयामध्ये तलाठी कार्यालय, पेठ येथे वडीलोपार्जित शेत जमिन मी माझ्या नावे खरेदी केली आहे. त्यांची नोंद फेर फार वर घेण्यासाठी अर्ज दिला आहे. सदर फेर फार करुन सातबारा सदरी नोंद घेण्यासाठी तलाठी कार्यालय, पेठ येथील तलाठी श्री.भागवत यांची भेट घेतली असता तलाठी कार्यालयातील तलाठी श्री.भागवत यांनी व त्यांच्या लेखनिक काम करण्यासाठी असणारे श्री.पिंटु (टोपननाव) यांनी माझ्याकडे सदर प्रकरणाची नोंद सातबारा सदरी घेण्यासाठी माझ्याकडे 6,000/- रुपये द्या असे म्हणाले. सदरची 6,000/- रु.ही शासकीय फी नसुन ती लाच मागत असल्याबाबत माझी खात्री झाली. तरी माझ्या घेतलेल्या जमिनीचा फेर फार करुन सातबारा सदरी नोंद घेण्यासाठी माझ्या नावाची नोंद घेण्यासाठी पेठ तलाठी कार्यालयातील तलाठी श्री.भागवत व लेखनिक पिंटु हे माझ्याकडे लाच मागणी करत असुन त्यांच्यावर आपल्या विभागाकडुन कायदेशिर कारवाई व्हावी हि नम्र विनंती. वगैरे मचकुराची तक्रार लिहुन दिली. मी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचानी वाचून पाहून त्यावर सही केली तसेच आम्ही समक्ष म्हणून सही केली.सदर कारवाई कामी पंच क्र.1 म्हणून श्री.राजेंद्र शंकरराव कदम व पंच 2 म्हणून श्री. शेखर दत्तात्रय शिवरकर हे काम करतील असे ठरवण्यात आले. त्यानंतर मला व पंचांना व्हाईस रेकर्डर बाबत माहिती दिली. ते चालू बंद करण्याचे प्रात्याक्षिक दाखविले. माझी व पंच नं.1 श्री.राजेंद्र कदम यांची निवेदने, डिजीटल व्हईस रेकर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आली. त्यानंतर मला तसेच पंचाना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सर्व सुचना दिल्या व समजावुन सांगितल्या व पडताळणी कामी मला व्हईस रेकर्डर लावुन पंच क्र.1 श्री.कदम यांचेसह तलाठी कार्यालय पेठ येथे रवाना केले.दि.02/11/2020 रोजीचे पेठ तलाठी कार्यालय येथील पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री भागवत यांनी मला फेर फार व सातबारा नोंदीचे कामासाठी बघु

ना...सहा हजार रुपये. इकडं तिकडं चालतंय असे म्हणाले. नंतर मी त्यांना चार एक हजार रुपये ना असे म्हणालो असता ते मला करु हां...उद्या येऊन जा करुन टाकु असे म्हणुन लाच मागणी केली असल्याचे तसेच त्यांनतर उद्या येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. यावर सरग मडम यांनी मला लाच मागणी रकमेची जुळवाजुळव करण्यास सांगितले असता परंतु सदरवेळी मी माझे वैयक्तिक अडचणीमुळे सरग मडम यांना कळविले की, सदरचे कारवाईदरम्यान तलाठी भाऊसाहेब यांनी मागितलेले चार हजार रुपये हे जास्त होतात. ते कमी करण्यासाठी मी परत पुढील वेळी समक्ष भेटुन विनंती करतो. तसेच दि.03/11/2020 रोजी मला चाकण एमआयडीसी येथे काम शोधण्यासाठी जाणे गरजेचे असलेने दि. 03/11/2020 रोजीचे कारवाईत सहभाग घेणे शक्य नव्हते असे सांगितले. त्यानुसार माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे ठरल्याप्रमाणे कारवाई न करता माझा फोन आल्यानंतर परत लाच रक्कम कमी करण्यासाठी पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले.मी दिनांक 08/11/2020 रोजी सरग मडम यांना संपर्क करुन कळविले की, मागील कारवाईचे वेळी भागवत भाऊसाहेब यांनी फोन केल्यानंतर तसेच त्यांनतर उद्या बोलवणार असल्याचे सांगितले होते परंतु त्यांनतर त्यांनी मला अद्याप फोन केला नाही. आणि त्यामुळे माझे काम अजुन झालेले नाही तसेच माझी पुढील इतर कामे त्यामुळे राहिली आहेत. तलाठी भाऊसाहेब उद्या दि.09/11/2020 रोजी कार्यालयात हजर आहेत त्यामुळे पुढील कारवाई दि.09/11/2020 रोजी केल्यास तलाठी भाऊसाहेब ऑफीसला भेटतील. असे मी सरग मडम यांना कळविले. त्यावरुन सदरची कारवाई दि. 09/11/2020 रोजी करण्याचे ठरले. तसेच दि.09/11/2020 रोजीचे कारवाई हटेल बिकानेर पुणे नाशिक रोड येथुन कारवाई करण्याचे ठरले.दि.09/11/2020 रोजीच्या हटेल बिकानेर पुणे नाशिक रोड येथीन पडताळणी कारवाईदरम्यान ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणादरम्यान भागवत तलाठी भाऊसाहेब यांच्याशी माझे समक्ष संभाषण झाले असुन सदरवेळी मी माझ्या सात बारा नोंदीचे कामासंदर्भात विचारणा केली असता तलाठी सायबांनी मला आनलाईनला स्पिड नसल्याचे सांगितले. त्यांनतर मी त्यांना माझे काम करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी मला बघु दिवाळीनंतर या असे सांगितल्याचे निष्पन्न झाले.यांनतर माझा मावसभाऊ मयत झालेने व कोरोना निर्बंधामुळे मला बाहेर जाणे शक्य नसलेने मला तलाठी भाऊसाहेब यांची भेट घेता आली नाही. परंतु कोरोना निर्बंध शिथील झाल्यांनतर मी ब-याचदा भागवत तलाठी भाऊसाहेब यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांची आणि माझी भेट झाली नाही. तसेच मी त्यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी मला कोणताही प्रतिसाद दिला नाही. यावरुन तलाठी भाऊसाहेब मला भेटणार नाही अगर माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाही अशी माझी खात्री झाली.यांनतर दि.19/09/2021 रोजी मी पोलीस निरीक्षक सरग मडम यांना फोन करुन दि.20/09/2021 रोजी बोलविले असता पोलीस निरीक्षक सरग मडम हया सापळा पथकसह आल्या त्यांनी मला यापश्चात अजुन सापळा कारवाईचे नियोजन करायचे आहे अगर कसे याबाबत विचारणा केली असता मी त्यांना भागवत तलाठी भाऊसाहेब हे माझ्या कामासंदर्भात टाळाटाळ करत आहेत त्यामुळे ते माझ्याशी स्वतरुहुन संपर्क साधणार नाहीत व यापुढे माझ्याकडून कोणत्याही प्रकारची लाच रक्कम मागणार नाहीत. त्यामुळे सदरची कारवाई स्थगित करण्यास माझी काहीएक हरकत नाही. असे सांगितले. त्यानुसार सर्वानुमते कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत माझा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला असुन कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.तरी माझ्या वडीलोपार्जित जमिनीची खरेदी मी केलेली असुन सदर जमिनीचा फेर फार करुन सातबारा सदरी नोंद घेण्यासाठी पेठ, मंचर तलाठी कार्यालयातील तलाठी हेमंत भागवत भाऊसाहेब यांनी माझ्याकडे प्रथम 6,000/- रु ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 4,000/- रु. लाचेची मागणी केली म्हणुन माझी 1) श्री. हेमंत भागवत, तलाठी, पेठ तलाठी कार्यालय यांचे विरुध्द तक्रार आहे.पुढील तपास श्रीमती अलका सरग सो,पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे ह्या करित आहेत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** satish balasaheb hodagar (I (Inspector)) / bopn83700 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अंमलदार
मंचर पोलिस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** satish balasaheb hodagar

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** bopn83700